प्रकरण सहावे

# दलित नेतृत्वाचे यश-अपयश

६.१ प्रस्तावना

दलित नेतृत्वाचे यश

६.२ सामाजिक यश

६.३ राजकीय यश

६.४ आर्थिक यश

दलित नेतृत्वाचे अपयश

## ६.१ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरण हे रिपाई नेतृत्वाचे यश-अपयश यासंदर्भात आहे हे प्रकरण या प्रबंधातील अभ्यासाच्या दृष्टीने अंतिम आहे. दलित नेतृत्वाचे यश म्हणजे काय? तर ज्या उद्देशासाठी दलित नेतृत्व उदयास आले तो उद्देश सफल झाला आहे किंवा नाही यालाच यश-अपयश असे म्हणतात. या प्रकरणात आंबेडकरोत्तर दलित राजकारणाच्या यश-अपयशाचा ताळेबंद आहे. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हयातीत जी चळवळ उभारली ती निश्चितच अस्पृश्यांना न्याय, हक्क, माणूसपण मिळवून देण्याची होती. हे करत असताना बाबासाहेबांनी अत्यंत चिकाटीने स्वतःच्या आयुष्याचा कसलाही विचार न करता आपले आयुष्य दलितांच्या उद्धारासाठी वाहिले. डॉ.बाबासाहेबांवर त्या काळात तत्कालीन काळाच्या व परिस्थितीच्या मर्यादा होत्या. त्यांच्या मनासारखे सर्वच काही घडले नाही पण त्या परिस्थितीत जे-जे काही करता येईल ते करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. भले त्यासाठी त्यांनी अनेकांचा विरोध सहन केला. अस्पृश्यांच्या समस्या सोडवायच्या असेल तर प्रथम उच्च शिक्षण घेतले पाहिजे. जातीयतेची परंपरा नष्ट करण्यासाठी त्यांनी बुद्ध-कबीर-फुले यांचा मार्ग चोखाळला. ब्रिटीशांसोबत अनेक बौद्धिक युक्तीवाद घडवून आणले. त्यासोबत गोलमेज परिषद, क्रिप्स मिशन, व्हेवेल योजना इत्यादींद्वारे राजकीय हक्क प्राप्त करून घेतले. विधिमंडळात प्रतिनिधित्व मिळवले. भारताला स्वातंत्र्य मिळणार तेव्हा भारताच्या राज्यघटनेच्या निर्मितीची प्रक्रिया चालू होती. घटना परिषदेत प्रवेश मिळवला आणि मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी दलितांना प्रौढ मताचा अधिकार दिला. अनेक घटनात्मक तरतुदी केल्या. त्यात संरक्षणाच्या तरतुदी केल्या. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी भावी राजकीय लढ्यासाठी सर्व शोषित जनतेचे प्रतिनिधित्व करणारे राजकीय अस्त्र दिले ते म्हणजे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व चारित्र्यसंपन्न होण्यासाठी बौद्ध धम्म. या दोन अस्त्राद्वारे माझ्यानंतरची आंबेडकरी चळवळ चालू रहावी आणि अस्पृश्यांना न्यायपूर्ण वागणूक मिळावी अशी त्यांची अपेक्षा होती.

दुर्दैवाने बाबासाहेबांचे १९५६ ला महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेबांनी घालून दिलेला आदर्श त्यांच्या अनुयायांनी मात्र अनुसरला नाही. जो उद्देश रिपाईच्या स्थापनेमागचा होता तोही अनुसरला नाही व बौद्ध धम्माचा स्वीकार करून जे आचरण व्हायला पाहिजे होते तेही झाले

नाही. उलट या आदर्शाविरुद्ध वाटचाल रिपाई नेत्यांची झालेली आहे. आंबेडकरोत्तर रिपाई नेत्यांना अपयश जरूर आलेले आहे यात दुमत नाही. पण काही प्रमाणात यशही संपादन केलेले आहे. या सर्वांचा ऊहापोह येथे करण्यात आलेला आहे.

**दलित नेतृत्वाचे यश :**

रिपाई किंवा दलित नेतृत्वाच्या यशाचे आपणास ढोबळमानाने चार भाग करता येतील.

**६.२ सामाजिक यश :**

जेव्हा आपण रिपाईच्या सामाजिक यशाची चर्चा करतो तेव्हा प्रामुख्याने एका बाबींचा विचार करावे लागेल तो म्हणजे बाबासाहेबांचा स्वाभिमानी वारसा यामुळे अस्पृश्यांनी अनेक पारंपरिक वतनाची, गावकीची कामे सोडली. स्वाभिमानाने जगायला शिकले. १९५६ च्या बौद्ध धम्माच्या स्वीकारामुळे एक आत्मविश्वास निर्माण झाला. पुढे १९६४-६५ ला दादासाहेब गायकवाड व यशवंतराव चव्हाण यांच्यात जी सामाजिक अभिसरणाची युती झाली. त्यातून बौद्धांना सवलती मिळाल्या. राखीव जागाची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यात आला. अस्पृश्यता बंदी कायदे, राज्याच्या तत्त्वाची अंमलबजावणी व भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यातील तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. सामाजिक अभिसरणामुळे खेड्यातील बौद्धांवरील अन्याय कमी करण्याचा प्रयत्न झाला. रिपाईच्या वतीने लोकसभेत राखीव जागांचा प्रश्न, वेठबिगार मजूरांचा प्रश्न, वीसकलमी कार्यक्रमाचे बील, सिलिंग कायदा, दुष्काळासाठी सुखठणकर समितीची निर्मिती मराठवाडा विकास परिषद इत्यादी सामाजिक यश रिपाईने विधिमंडळात आपल्या पक्षाच्या वतीने आमदार व खासदारांनी प्राप्त केलेले होते. रिपाईने विधिमंडळात जनतेच्या प्रश्नावर आवाज उठविलेला दिसून येतो. पक्षाच्या आमदार, खासदारांनी सभागृहात दलितांच्या आदिवासीच्या, भटक्या-विमुक्त समाजाच्या मागासवर्गीय समाजाच्या आणि स्त्रियांच्या प्रश्नावर आवाज उठविलेला आहे.

**६.३ राजकीय यश :**

रिपाईच्या राजकीय यशाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा प्रामुख्याने दलितांसाठी स्वतंत्र राजकीय पक्ष असणे हीच एक फार मोठी राजकीय कामगिरी आहे. कारण बरेच हिंदू

दलित स्वतःचा राजकीय पक्ष न काढता इतर राजकीय पक्षात सामील आहेत. पण आंबेडकरानंतर आंबेडकरी अनुयायांनी मात्र रिपाई या राजकीय पक्षाचे अस्तित्व जिवंत ठेवलेले आहे. सध्याचे भारतीय राजकरण पाहता एका विचारधारेचा पक्ष जिवंत असणे व तो निवडणुकीत गेल्या ६० वर्षापासून टिकून आहे ही एक स्वाभिमानाची गोष्ट आहे. रिपाईने राजकीय पक्ष म्हणून यशस्वीरित्या निवडणुका लढविलेल्या आहेत. सरासरी ३ ते ४ मतदानाची प्राप्ती पक्षाला होते. पक्षाला विशिष्ट विचारधारेचा जनाधार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात दलितांच्या मताची दखल घ्यावीच लागते. अन्यथा निवडणुकांचा निकाल दलित कोणतेही भूमिका घेतात त्यावर अवलबून असतो. रिपाईने अनेक आमदार, खासदार, मंत्रीपदे उपभोगली आहेत. या सर्व संधीचा लाभ घेऊन समाजाच्या हितासाठी वापर करण्यात आलेला आहे. १) बौद्धांच्या सवलती २) राखीव जागांचा प्रश्न ३) नोकऱ्यांतील अनुशेष ४) गायरान जमिनीचा प्रश्न ५ ) महात्मा फुले आर्थिक विकास मंडळ इत्यादी लाभ समाजासाठी प्राप्त झालेले आहेत. या व्यतिरिक्त भारिप-बहुजन महासंघाच्या अॅड.प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली पक्षाने किंवा चळवळीने महाराष्ट्राच्या राजकारणात बहुजन व दलित असा सामाजिक अभिसरणाचा प्रयोग त्यांनी केला. विशेषतः विदर्भात दलित, अल्पसंख्याक व इतर मागास वर्ग अशी समाज राजकीय युती करून विधिमंडळात प्रवेश मिळवलेला आहे. ही एक प्रकारची राजकीय उपलब्धता होय. त्यास 'अकोला पॅटर्न' या नावाने ओळखले जाते. २००९ च्या निवडणूकीत रिपाईच्या रामदास आठवले गटाच्या वतीने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्राच्या राजकारणात एका नवा पर्याय उभा करण्याचा प्रयत्न केला. १७ राजकीय पक्ष व संघटना एकत्र करून त्यांनी आघाडी निर्माण केली. तिचे नाव 'रिडालोस' असे होते. प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी १९८४-८५ ला हाजी मस्तान व पिपल्स रिपब्लिकन पार्टी यांची युती होऊन 'दलित-मुस्लिम सुरक्षा महासंघाची' स्थापना केलेली होती. असे अनेक राजकीय प्रयोग महाराष्ट्राच्या राजकारणात रिपाईच्या वतीने झालेले आहेत. यावरून असे लक्षात येते की, रिपाईने राजकीय यश प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पण अंतर्गत फुटीमुळे या पक्षास प्रभावी अशी राजकीय कामगिरी करता आली नाही.

## ६.४ आर्थिक यश :

आंबेडकरानंतर रिपाईची भूमिका अर्थकारणाच्या बाबतीत नेहमी आक्रमक राहिलेली आहे. कारण सर्व दलित समाज व तिची आर्थिक अवस्था दयनीय असल्यामुळे चळवळीचे मुद्दे आर्थिकच होते पण ते राबविले गेले नाहीत. रिपाईच्या उद्देशाप्रमाणे आर्थिक न्याय व समता प्रस्थापित करणे हे उद्देश आहे. त्यासाठी रिपाईच्या वतीने जे प्रयत्न म्हणून झाले त्यात दादासाहेब गायकवाडाचा दलिताच्या भूमीहीन सत्याग्रहाचा १९६४-६५ चा प्रयोग फार महत्वपूर्ण घटना समजली जाते. शासनाची गायरान जमीन भूमिहीनांना मिळवून देण्यासाठी दादासाहेब गायकवाडांनी दिल्लीच्या संसदेवर एक लाख लोकांचा मोर्चा काढला. तत्कालिन पंतप्रधान लालबहादरू शास्त्रींना एक निवेदन देण्यात आले व जवळपास २ लाख एकर जमीन भूमिहीनांना वाटप करण्यात आली हे फार मोठे आर्थिक यश रिपाईने त्या काळात मिळविले आहे. मा.पंतप्रधान व्ही.पी. सिंगच्या काळात महाराष्ट्रात १९८९ ला दलितांच्या उन्नतीसाठी म.फुले व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती करण्यात आली. अर्थसंकल्पीय बजेटमध्ये अनुसचित जाती-जमातीसाठी वाढीव बजेटची तरतूद करण्यात आली. ओबीसीकरिता मंडल आयोगाच्या संदर्भात आंदोलन छेडले आणि १९९० ला ओबीसींना राखीव जागाची सवलत मिळाली. १९५९ ला रिपाईने औरंगाबाद येथे १) जमिनीचे राष्ट्रीयकरण करावे. २) जातीधर्म निरपेक्ष रितीने शेती करता यावी असे ठराव पास केले. भाषावार प्रांतरचनेच्या बाबतीत बाबासाहेबांच्या भूमिकेचा पाठपुरावा करण्यात आला. रिपाईने भूमिहीनांच्या प्रश्नासोबतच जमीनदारी प्रथा नष्ट करणे, भूमीचे फेरवाटप करणे, कुळकायदा प्रभावीपणे अंमलात आणणे, भूमिहीनांना जमीनी देणे इत्यादी प्रश्न विधिमंडळात उपस्थित केलेले आहेत. रिपाई हा सत्तेत आलाच नाही. एखादे दुसरे मंत्रिपद मिळवणे व त्याचा समाजासाठी फायदा करणे याला मर्यादा आहेत. पण रिपाईने आंदोलनाच्या द्वारे दलितांसाठी बऱ्याच कल्याणकारी गोष्टी मिळविलेल्या आहेत.

### दलित नेतृत्वाचे अपयश :

रिपाईचे राजकीय अपयश म्हणजे या पक्षाची स्थापना ज्या उद्देशाने झाली, पक्षाचा जाहिरनाम्यातील उद्देश आणि त्यानुसार वाटचाल याचा आढावा या प्रकरणात ‘अपयश’ या

शिर्षकाखाली घेण्यात आलेला आहे. रिपाईला फार मोठा वैचारिक वारसा बाबासाहेब आंबेडकरांचा आहे. त्यामुळे बाबासाहेबांच्या नंतर या पक्षाने जे प्राप्त करायला पाहिजे होते ते मिळवले किंवा केले की नाही याचा ऊहापोह येथे आहे.

१) रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेपासूनच या पक्षात दुहीची बीजे पेरली गेली. सत्तालोलूपता हे एक महत्त्वाचे कारण असले तरी जी वैचारिक किंवा राजकीय प्रगल्भता बाबासाहेबांकडे होती तिच्या जवळपास जाणार नाही अशा नेत्यांच्या हातात रिपब्लिकन पक्षाची सूत्रे गेली.

२) भारतातील जातीबद्ध मानसिकतेवर मात करण्याचा कार्यक्रम या पक्षाला आखता आला नाही. त्यामुळे जात आणि वर्गविरोधी संयुक्त लढा उभारून सर्वशोषितांची बांधणी करता आली नाही.

३) बौद्ध दलित जातीशिवाय इतर हिंदू दलित म्हणजेच मातंग, चांभार, ढोर, बुरुड, कैकाडी इत्यादी जातींना काँग्रेस, शिवसेना व भाजना या पक्षाने सोबत घेतले त्यामुळे रिपब्लिकन पक्षाला व्यापक जनाधार मिळवता आला नाही. ही एक फार मोठी शोकांतिका आहे. रिपाई 'बौद्धांसाठी' आहे असे चित्र निर्माण झाले.

४) महार-मांगाना एकत्र आणण्याचे बाबासाहेबांचे प्रयत्न बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणांतर थांबले ते थांबले. बाबासाहेबाबरोबर बौद्धेतर दलित मनापासून किंवा सरसकट गेले नाहीत हे वास्तव आहे. नवबौद्ध किंवा समकक्ष जातीतली दरी साधण्याएवढा कर्तृत्ववान नेतृत्व रिपाईत निर्माण झाले नाही.

५) गेल्या ६० वर्षात रिपब्लिकन अनुयायांनी आजपर्यंत भूमीहिनांचे सत्याग्रह, बौद्धांच्या सवलती, गायरान जमिनीचा प्रश्न, शिष्यवृत्ती, झोपडपट्टीचे प्रश्न, महागाई, बेरोजगारी, दलितांवरील अन्याय, रिडल्स, नामांतर लढा इत्यादी काही चळवळी व अस्मितेचे लढे उभारले व रिपाईची चळवळ जीवंत ठेवली परंतु हे सर्व लढे, आंदोलने दलित बौद्धांच्या कक्षेतीलच आहेत. आपल्या कक्षेबाहेरील विषय हाताळले गेले नाहीत.

६) दलित राजकारण हे आपले क्रांतिकारकत्व व आक्रमकपणा सोडून देत आहे. परिवर्तनवादी भूमिकेशी तडजोड करत आहे. याचा अर्थ असा आहे की, सत्तेसाठी तडजोडी करणे व सत्ता प्राप्त करणे हे एकमेव उद्देश राहिलेले आहे. समाजकेंद्रीत राजकारणाऐवजी निवडणूककेंद्रीत राजकारण करणे.

७) संविधानात आरक्षणाशिवाय दुसरे काहीही ठेवले नाही. मात्र संविधानासोबत आंबेडकरांचे नाव जोडले गेले असल्यामुळे दलित ती चौकट बदलण्याचा प्रयत्न करत नाहीत. सापेक्ष वंचिततेच्या प्रभावापेक्षा संविधानात आंबेडकरांनी सर्व काही ठेवले आहे. आता काही नवीन करण्याची गरज नाही, ही मानसिकता दलितांसाठी घातक आहे. कोणताही दलित नेता व बुद्धीजीवी आंबेडकरांच्या राज्य समाजवादी किंवा घटना समितीने नाकारलेल्या प्रस्तावाची चर्चा करत नाही.

८) आज संकुचित अर्थाने 'दलिताचे ऐक्य' म्हणणजेच 'नेत्याचे ऐक्य' हा शब्दप्रयोग करण्यात येतो.

९) आंबेडकरी चळवळ म्हणजे फक्त रिपब्लिकन पार्टी नव्हे तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा तिचा आविष्कार असून त्यामध्ये आंबेडकरी साहित्य चळवळ, दलित रंगभूमी, सामाजिक-आर्थिक चळवळ, विद्यार्थी, महिला, कामगार चळवळ इत्यादींचा समावेश होतो. परंतु हल्ली आंबेडकरी चळवळ म्हणजेच रिपब्लिकन पक्ष एवढाच संकुचित अर्थ घेतला जातो हे योग्य नाही.

१०) भूमिहीनांचा सत्याग्रह, आरक्षण, गायरान जमिनी, नामांतराचा प्रश्न, रिडल्स प्रकरण वगळता रिपब्लिकन पक्षाचे राजकारण हे नेत्यांभोवतीच फिरत राहिले. समाजाचे प्रश्न सोडवण्यात फार मोठे यश तो मिळवू शकला नाही.

११) 'दलितांनी राज्यकर्ती जमात व्हावे' याचा फारच शब्दशः अर्थ सत्तापदापर्यंत पोहचणे हेच या पक्षाच्या सर्वच गटांना आंबेडकरी राजकारण वाटले. सवलती, आरक्षण आणि सत्तारुढ पक्षाने दिलेली अधिकारपदे यांच्या पलीकडे जाऊन लोकांच्या जगण्या-मरण्यावरचे संघर्ष, लढे उभे करणे व तळापासून पक्ष बांधणी करणे याकडे कोणत्याच गटाचे लक्ष दिले नाही.

१२) रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांनी आंबेडकरांच्या सुटया विधानाचे चुकीचे, शब्दशः व विपर्यस्त अर्थ काढून त्यांना मार्क्सचा विरोधक मानले आणि सगळया डाव्या शक्तीपासन व चळवळीपासन स्वतःला तोडले. दादासाहेब गायकवाड, नामदेव ढसाळ यांच्यावर कम्युनिस्ट धार्जीणे असा शिक्का मारून पक्षात फूट घडवून आणण्यातआली. दादासाहेबांच्या मृत्युनंतर पक्षाला व्यापक वैचारिक भूमिका देणारा नेताच या पक्षात उरला नाही. शेतमजूर व औद्योगिक कामगार यांच्या शक्तीला हा पक्ष कायमचा मुकला.

१३) बाबासाहेबानंतर आंबेडकरी चळवळीने किंवा रिपाई पक्षाने बाबासाहेबांची बौद्ध धम्माची चळवळ गतिमान करणे गरजेचे होते. मार्क्सची उद्दिष्ट्ये बुद्धाच्या मार्गाने साध्य करण्याचे कार्य व्हायला पाहिजे होते पण ते झाले नाही. उलट ढसाळ 'मार्क्सवादी' तर ढाले 'बौद्धवादी' अशी विभागणी करून पँथरमध्ये फूट पाडण्यात आली. व सरकारकडूनच बौद्ध धम्माच्या प्रचाराची जबाबदारी पूर्ण करून द्यावी असे कार्यक्रम आखले गेले.

१४) बाबासाहेबांचे स्वप्न होतं सारा देश बौद्धमय करीन. तसेच धम्मचक्र प्रवर्तनाचा राजकीय संदर्भ लक्षात घेता बाबसाहेबांच्या अनुयायांनी धम्माच्या चळवळीशी राजकीय चळवळीनं फारकतच घेतली. राजकीय सत्तेच्या प्राप्तीसाठी सामाजिक, आर्थिक लोकशाहीचे बळकट आधार उभे करण्याची गरज बाबासाहेबांना वाटत होती पण त्यांच्या अनुयायांनी मात्र दुर्लक्ष केले. ज्याचे काशिरामने अराजकीय आधार असे वर्णन केलेले आहे.

१५) डॉ.आंबेडकरांनी ब्राह्मणवाद आणि भांडवलशाही या दोघांनाही दलित समाजाचे शत्रू मानले. प्रत्यक्षात मात्र धम्म चळवळीने ब्राह्मणवादाची जेवढी चिकित्सा केली तेवढी भांडवलशाहीची केली नाही. पुढे जागतिकीकरणाच्या रूपाने आलेल्या नव-भांडवलशाहीची चिकित्सा होणे गरजेचे आहे. आपण राजकीय क्षेत्रात एकत्र काम करू शकत नाही तर किमान धार्मिक क्षेत्रात तरी एकत्र राहिले पाहिजे.

१६) स्वतःला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय वारसदार म्हणवणाऱ्यांनी बाबासाहेबांच्या पश्चात त्यांचे मूळ विचार व्यापक स्वरूपात मांडले नाहीत किंवा बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या व्यापक आणि गतिमान रिपब्लिकन पक्ष उभारण्याचे प्रयत्न केले गेले नाहीत. यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे किंवा अस्पृश्यांचे नेते नव्हते तर या देशातील धार्मिक, सामाजिक विषमतेविरुद्धचे ते एक बंड होते.

१७) रिपाईने बाबासाहेबांचे राजकीय विचार प्रसारित करण्याचे सोडाच परंतु बेकारी, महागाई, भ्रष्टाचार, झोपडपट्टी, खाजगी क्षेत्रातील आरक्षण, गायरान जमिनीचे प्रश्न, आरक्षण धोरणाची अंमलबजावणी, दलितांवरील हल्ले, ॲट्रॉसिटी कायद्याची अंमलबजावणी इ. प्रश्नावर उठाव, मोर्चे, चर्चा, आंदोलनेच केली जात नाहीत. राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय प्रश्नांबद्दल आपलीही काही भूमिका असू शकते याची दलित नेतृत्वाला कल्पनाच नाही. उदा.जागतिकीकरण, खाजगीकरण इत्यादी.

१८) आंबेडकरांचे अनुयायी म्हणविणाऱ्या अनुयायांना असे वाटते की, दलितातील इतर घटकांनी म्हणजे मातंग, चांभार, ढोर, होलार इत्यादी. प्रथम बौद्ध धर्म स्वीकारला पाहिजे पण हा आग्रह चुकीचा असून तो ऐक्याच्या विरोधी आहे. केवळ बौद्ध होण्याने दलितांचे सगळे प्रश्न सुटण्यासारखे नाहीत. बाबासाहेबांना देखील याची जाणीव होती आणि म्हणूनच त्यांनी 'रिपब्लिकन पक्ष' हे नवे हत्यार जनतेला दिले.

१९) संघटनेला, पक्षाला अनेक प्रकारे मध्यमवर्ग हातभार लावत असतो. जसे कम्युनिस्ट, समाजवादी आणि जनसंघ इत्यादी पाठीशी असा मध्यमवर्ग संघटितपणे उभा आहे. खेदाची गोष्ट ही की, रिपब्लिकन चळवळीकडे व पक्षाकडे असे पाठबळ नाही. याला दलितातील सुशिक्षित मध्यमवर्ग जबाबदार आहे.

२०) रिपब्लिकन ऐक्य ही घटना कितीही विलोभनीय असली तरी ऐक्याच्या नावाखाली एका जातीचे लोक एकत्र येणे आणि त्याच जातीतल्या लोकांनी नेतृत्व करणे ही बाबासाहेबांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाला छेद देणारी घटना आहे.

२१) बाबासाहेबांच्या नंतरच्या नेतृत्वात थोडाफार स्वरूपात्मक बदल सोडल्यास गुणात्मक फरक फारसा आढळत नाही. सवलती, अन्याय-अत्याचाराविरुद्धची प्रतिक्रिया, भावनात्मक प्रश्नावर चळवळी करणे व संघटना टिकविण्यासाठी धडपड यापलीकडे नेतृत्व जाऊ शकले नाही. उद्योग, जमिनीचे राष्ट्रीयकरण, शिक्षण, बौद्ध तत्त्वज्ञान, लोकशाही, अल्पसंख्याक, अर्थरचना, निवडणूक पद्धत इत्यादी अनेक प्रश्नावर बाबासाहेबांनी विचार मांडले आहेत. त्याचा सद्य परिस्थितीत अन्वयार्थ लावून तो विचार सामान्य माणसापर्यंत पोहचून त्याला राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित करण्याचे काम अजुनपर्यंत केले गेले नाही.

२२) रिपाईंचे पक्ष उभारणीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. आंबेडकरी विचाराच्या सर्व संघटना व आंदोलने एकत्र करून अराजकीय मूळ तयार करण्यात रिपाईला अपयश आले. पक्षाची संघटनात्मक बांधणी करता आली नाही म्हणून बराच दलित तरुण इतर पक्षात काम करताना दिसत आहे.